# ‘दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे स्पृहणीय यश’

सोलापूर - दि. २५/०५/२०१६, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी/मार्च-२०१६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. दयानंद महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेचा एकुण निकाल ७७.०० टक्के आहे. कु. गुब्याड शिवलीला श्रीशैल ही विद्यार्थीनी ९१.०७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आली आहे. श्री. नोगजा आकाश संजय हा विद्यार्थी ८९.६९ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत व्दितीय क्रमांकाने तर श्री. आडके कार्तिक हा विद्यार्थी ८७.०८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

श्री. आकाश नोगजा हा विद्यार्थी भूशास्त्र विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवून पुणे विभागात प्रथम आला आहे.

कला शाखेचा एकूण निकाल ६९ टक्के आहे. कला शाखेमध्ये श्री. वाघमोडे अजय प्रल्हाद हा विद्यार्थी ७६.३० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला आहे. श्री. पवार आकाश बाळू हा विद्यार्थी ७२.७६ टक्के गुण मिळवून कला शाखेत व्दितीय क्रमांकाने तर कु. शेख सना नबीलाल ही विद्यार्थीनी ७१.२३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचा (एम.सी.व्ही.सी.) एकूण निकाल ९०.३२ टक्के लागला आहे. श्री. फलमारी अक्षय हा विद्यार्थी ७४.३० टक्के गुण मिळवून व्यवसाय अभ्यासक्रमात प्रथम आला असून श्री. घोडके अक्षय हा विद्यार्थी ७२.१५ टक्के गुण मिळवून व्दितीय आला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे स्थानिक सचिव डॉ. महेशजी चोप्रा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. वडगबाळकर, उपप्राचार्य श्री. एस.पी.गायकवाड, पर्यवेक्षक श्री. विजय बिराजदार आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.